# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०५/२०१८

**१) निष्काळजीपणे कंटेनर चालवुन ७ लोकांना गंभिर जखमी करून ५ लोकांच्या मरणास कारणभुत झाल्याने गुन्हा नोंद ;–**

दिनांक ३०/०४/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने कोणत्या तरी अमली पदार्थाचे सेवन करून वाहन चालवील्यास वाहना वरील ताबा सुटुन अपघात होवुन कोणत्याही ईसमाचा जिव जावु शकतो असे माहीत असुन सुध्दा यातील आरोपीने कोणत्यातरी अमली पदार्थाचा सेवन करून हेतु पुरस्पर त्याचे ताब्यातील कंटेनर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन १ चार चाकी वाहन, २ मोटार सायकल तसेच २ मोपेड गाडया आणी गांडयाच्या बाजुला ऊभे असलेल्या ईसमांना धडक मारून १) चंद्रशेखर यादवराव मुरकुटे वय ३३ वर्ष रा. हिंगणघाट २) प्रदीप मानिकराव भोंगाडे वय ३० वर्ष रा. हिंगणघाट ३) अनिकेत किशोर कुकडे वय २४ वर्ष रा. खापरखेडा ४) प्रणाली शेंडे वय १२ वर्ष ५) मंयुरी शेंड वय १५ वर्ष दोन्ही रा. हिंगणघाट ६) प्रियंका मुटकुरे वय ४० वर्ष रा. हिंगणघाट ७) सोनु शेंडे वय १७ वर्ष रा. हिंगणघाट या लोकांना गंभिर जखमी करून तसेच मृतक १) रोहित शशीकुवर बांडेबुचे वय २० वर्ष रा. नागपुर २) अमित धनपाल लांडगे वय ३० वर्ष रा. नागपुर ३) देवराव चिंतामन शेंडे वय ४० वर्ष रा. हिंगणघाट ४) वैशाली देवराव शेंडे वय ३५ वर्ष रा. हिंगणघाट ५) देव्याशु संजय भुसारी वय ५ वर्ष रा खोकरला पो.स्टे.मोहदुरा या लोंकाच्या मरणास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हेमके यांचे रिपोर्ट वरून लाखनी पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०४(II) ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. नी. सोरसे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन शासकीय कामात अडथडा निर्माण करून शिवीगाळ करून शासकीय वाहनाची तोडफोड करून जाणा–या येणा–या रहदारीस अडथडा निार्मण केल्याने गुन्हा नोंद ;–**

दिनांक ३०/०४/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व तीचे सहकारी हे अपघात स्थळी जावुन घटणा स्थळावरील जखमी व्यक्तींना औषधोपचार कामी सरकारी वाहनाने रूग्नालयात नेण्याकरीता उचलत असतांना मा. जिल्हाधिकारी सा. भंडारा यांचे जमाव बंदी आदेश असतांना सुध्दा यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व त्यांचे सहकारी हे आपले शासकीय कर्तव्य बजावीत असतांना आरोपी चालकास आमचे समोर आणा नाहीतर आम्ही पेट्रोल टाकुन ट्रक पेटवुन देवु असे बोलुन शिवीगाळ करून धमकी दिली व फिर्यादी व तिचे सहका–यास व ट्रक शासकीय वाहनाची तोडफोड करून जाणा–यास येणा–या रहदारीस ४ तास थांबवुन जाण्यास अडथळा निर्माण केल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. प्रिती आळे यांचे लेखी व डॉ. रिपोट रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,३५३,३३२,१४७,१८६,५०४ भादवी. सहकलम १३५ मपोका. सहकलम ३ सा.मा.न. कायदा सहकलम ७ दी. क्रिमीनल अपायमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) कंटेनेरची टिप्परला धडक लागुन टिप्परची नुकसान करुन स्वत: जखमी झाल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक ०१/०५/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील टिप्पर क्र. एमच ४० वाय ८०२३ चे चालकाने त्याचे ताब्यातील टिप्पर मध्ये पाचगाव खदानातुन गिट्टी भरुन नागपुर कडुन भंडारा कडे एनएच ६ रोडने येत असतांना पेट्रोल पंप ठाणा जवळ उडाण पुल्याचे वर आला असता टिप्पर मधील डिजेल संपल्याने टिप्पर रोडचे बाजुला लावुन टिप्परचे इन्डीकेटर चालु ठेवुन डिजेल आणण्यास क्लिनर प्रमोद हा गेला असता यातील आरोपी कंटेनर चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन उभा असलेला टिप्परला मागेहुन धडक देवुन अपघात करुन टिप्परची नुकसान करण्यास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रेवानंद शिवाजी चकोले वय २९ वर्ष, रा. मोहगाव देवी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) कंटेनरच्या धडकेत चार जखमी :—**

दिनांक ०१/०५/२०१८ चे ६.०० वाजता दरम्यान यातील ट्रॅक्टर क्र. एमच ३६ एल १६०४ हा एनएच ६ रोडने पालांदुर डोंगरगाव येथे जात असता यातील आरोपी कंटेनर चालकाने त्याचे ताब्यातील कंटेनर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागेहुन धडक मारल्याने ट्रॅक्टर चालक व टॉली मध्ये बसलेल्या तीन इसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रमोद रामभाऊ राहांगडाले वय ३० वर्ष, रा. परसोडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) मोटार सायकल भरधाव वेगाने चालवुन दोघांना जखमी करण्यास व स्वत: जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०१/०५/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याची पत्नी व मुले तसेच जखमी श्रीमती सुजाता मोटघरे हीची मुलगी कु. क्षृती वय १० वर्ष, असे मिळुन कारधा नाका येथे रिसेप्शन करीता पायी रोडाने जात असता यातील आरोपी चालाकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमी सुजाता व तीची मुलगी क्षृती यांना मागेहुन धडक मारुन जखमी करुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे दिनेश मारोती बोरकर वय ३८ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा याचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शिवीगाळ करुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३०/०४/२०१८ चे १९.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घराकडे जात असता यातील आरोपी क्र. १ ते ३ हया तीला पाहुण तीचा भाऊ प्रणय बद्दल जोराजोरात बोलत असतांना फिर्यादीने तिचा भाऊ हा लोकेश मेश्रामच्या घरी उसने दिलेले पैसे मागण्यास गेला होता तो घरी नसल्याने मंगेश मेश्राम चा दार ठोकला असे समजवत असता या कारणा वरुन आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी सोबत भांडण करुन थापडाने डावे बाजुचे डोळ्यावर व डोक्यावर मारहान केली फिर्यादीचे वडील व बहीन प्रणाली भांडण सोडविण्यास गेले असता आरोपी क्र. ४ व ५ यांनी फिर्यादीचे वडील व बहीन यांना थापड बुक्यांनी मारहान केली तसेच आरोपी क्र. ६ याने फिर्यादीच्या बहीनीचा डावा हात धरुन ओढतांन करुन सर्व आरोपीतांनी शिवीगाळ केली तसेच आरोपी क्र. ३ ही फिर्यादीचे वडीलास मार असे अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ ते ६ यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी व तीचे बहीनीचा विनयभंग करण्याचे उद्येशाने हमला केला असे फिर्यादी तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १४७,१४९,३२३,३५४,३९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) घरात प्रवेश करुन महिलेला शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९/०४/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घरी एकटी असतांना यातील आरोपीने तीचे मागचे घराचे अंगणात येवुन मागील दार बाहेरुन ठोकावुन तीचा एकांतपणाचा फायदा घेवुन विनयभंग केला व आपले तोंडावर बोट ठेवुन चुप सहण्याचा ईशारा केला व शिवीगाळ केली असे फिर्यादीचे याचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४७,५०९,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) संगनमत करुन शिवीगाळ करून थपड बुक्यानी मारपीट केल्याने गन्हा नोद :—**

दिनांक २९/०४/२०१८ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची काकु व बहीन हया फिर्यादीचे घरा समोरील अंगणात चर्चा करीत असता यातील आरोपी क्र. १ ही फिर्यादीचे अंगणात येवुन फिर्यादीचे घरातील सर्व लोकांना शिवीगाळ करीत होती तेव्हा फिर्यादी हा समजविण्यास गेला असता यातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन फिर्यादीला थापड बुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादीचे याचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४७,५०९,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुसावडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**९) ऊस गाळण्याचे मशिन मध्ये दुपटटा अटकुन गळफास लागल्याने इसमाचा मृत्यु:—**

दिंनाक ०१/०५/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक तुकाराम मुकरू मेश्राम वय २७ वर्ष रा. मडेघाट हा ऊस गाळण्याचे इंजिनचे मशिनवर ऊसाचे रसग ाळत असतांना त्याचे गळयातील दुपटटा इंजिन मध्ये अटकुन गळफास लागल्याने त्यास औषधोपचारा करीता वैदयकीय अधीकारी यांनी मृतकास तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी लवकुश गोवींदा भोयर वय ३० वर्ष रा. मडेघाट यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. वडेटीवार पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०१/०५/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दिघोरी टि.पांइट रोड येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पो.ना.मटाले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. चाचेरे पोलीस स्टेशन दिघोरी करीत आहेत.

**११) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा,वरठी आंधळगाव, गोबरवाही, साकोली व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०५ लिटर हातभट्टी दारू + २००० किलो सडवा + साहीत्य किंमती ८१,४५०/–रु. व ३१ लिटर ४२० मिली लिटर देशी /विदेशी दारु + २ मोटार सायकल किंमती ५२,०२९/रु. तसेच जुगारातुन ८३,६०५/रु. असा एकुण किंमती २,१७०८४/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०४ तीन सिटर वाहनाकरीता– ०३ ईतर वाहनांवरती – १०८ केसेस करण्यात आले आहे.


(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.